# <u>फुलो</u>

नको ती प्रतिमा नको तो चकवा
नको जो फसवा सत्य तोच हवा ||१||

नको सांत्वना नको धमकावण्या
नको वल्गना सामनाच होऊ द्या ||२||

नको कल्पना मुद्देसूद मांडणी
व्हावा साक्षात्कार नसता मागणी ||३||

नको सारांश वा फापटपसारा
शुध्द अनुभवाचा फुलो पिसारा ||४||

– नारायण
०८/०८/२३